महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण- इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली

## समाजशास्त्र विभाग

(२०२४-२५)

## शैक्षणिक सहल अहवाल

**सहल मार्ग**

इस्लामपूर - कोल्हापूर - कुणकेश्वर – मालवण - सिंधुदुर्ग - इस्लामपूर

**वार व दिनांक**

बुधवार, दि. ०५/०२/२०२५ व गुरुवार, दि. ०६/०२/२०२५

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण- इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली

## समाजशास्त्र विभाग

शैक्षणिक सहल (२०२४-२५)

(इस्लामपूर – कोल्हापूर – कुणकेश्वर – मालवण – सिंधुदुर्ग – इस्लामपूर)

## अहवाल

समाजशास्त्र विभागामार्फत, सन २०२४-२५ या वर्षातील शैक्षणिक सहल बुधवार, दि. ०५/०२/२०२५ व गुरुवार, दि. ०६/०२/२०२५ रोजी इस्लामपूर – कोल्हापूर – कुणकेश्वर – मालवण – सिंधुदुर्ग याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. पूर्वनियोजनानुसार बुधवारी सकाळी ५ वाजता इस्लामपूर येथून सहल प्रवास सुरु झाला. प्रा. एकनाथ पाटील यांच्या नातेवाईकांच्या फार्महाऊसला राधानगरी येथे भेट देण्यात आली. फार्महाऊस हे ग्रामीण कृषीप्रधान समाजव्यवस्थेमध्ये पर्यटन व्यवसायाची संधी निर्माण करत असल्याचे श्री. प्रेमजित ढेरे यांनी सांगितले. आपल्या स्थानिक उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचा वापर व्यावसायिक दृष्टिकोनातून करता येऊ शकतो याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. मनोरंजनाच्या सोबतच भौगोलिक विविधता, तेथील स्थानिक समाज जीवन समजून घेण्याचा उद्देश या पहिल्याच टप्प्यावर यशस्वी होताना दिसला.

यानंतर फोंडाघाटमार्गे कुणकेश्वर येथे दुपारी १२ च्या दरम्यान विद्यार्थ्यांनी सोबत आणलेल्या जेवणाचा आस्वाद घेऊन मालवण सिंधुदुर्ग येथे ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्यास भेट देण्यात आली. भारतीय नौदलाचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांनी सागरी मार्गावरील शत्रूंची स्वारी परतून लावण्यासाठी जलदुर्गाची निर्मिती महत्त्वाची आहे, हे ओळखून सागरी किल्ले निर्माण केले. त्यापैकीच एक म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला होय. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारात या किल्ल्याला विशेष महत्व होते. याची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली.

मालवण येथील बाजारपेठेला भेट दिल्यांनतर पहिल्या दिवसाचा मुक्काम देवबाग याठिकाणी करण्यात आला. त्याठिकाणी सामुहिक सहभोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर रात्री विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक, वैचारिक कार्यक्रम आयोजित केले. वेगवेगळ्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीतून आलेले विद्यार्थी एकत्रित व एकात्मतेने उत्साहपूर्वक सहभाग नोंदवत होते. **समाजशास्त्रीय विचारवंत जॉर्ज मिड यांची 'आत्म विकास' व 'आपण भावना' (समूह भावना) या संकल्पना** विद्यार्थ्यांनी वर्गाध्यापनाच्या चार भिंतीच्या बाहेर स्वतःहून समजून घेतल्या.

दुसऱ्या दिवशी (गुरुवार) सकाळी नाश्ता केल्यानंतर कोकण पर्यटन सौंदर्य, सागरी सफर करण्यात आली. बोटीतून देवबाग समुद्र सफरीअंतर्गत भोगवे बीच, मिनी केरळ, युरोपियन सीगल पक्षी

पॉईंट, डॉल्फिन पॉईंट, २००४ च्या त्सुनामीने तयार झालेले त्सुनामी आयलंड; कर्ली नदी आणि अरबी समुद्राचा संगम होणारा संगम पॉईंट, समुद्रात असलेल्या मोठ्या कातळावर सूर्यप्रकाश पडल्यावर सोनेरी दिसणारा गोल्डन रॉक ही प्रेक्षणीय स्थळे पाहण्यात आली. त्यानंतर दुपारच्या जेवणानंतर काही वेळ विश्रांती घेऊन सायंकाळी रॉक गार्डन येथे भेट देण्यात आली. तेथे सनसेट पॉईंट व म्युझिकल फौंटन तसेच दगडांचा नैसर्गिकरीत्या तयार झालेला वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध याठिकाणी विद्यार्थ्यांनी छायाचित्रणाचा आनंद लुटला. त्यांतर सहलीचा परतीचा प्रवास सुरु झाला. कोल्हापूरमध्ये आल्यानंतर जेवण करण्यात आले. रात्री १ च्या दरम्यान सहल इस्लामपुरात दाखल झाली. विद्यार्थी-विद्यार्थिनींना सुखरूपपणे त्यांच्या घरी पोहोचवण्यात आले.

अशारितीने दोन दिवसीय शैक्षणिक सहल अभ्यासपूर्ण, उत्साहपूर्वक, सुरक्षितपणे संपन्न झाली.

## शैक्षणिक सहलीतून साध्य बाबी

१. समाजशास्त्रीय संकल्पनांचे व्यावहारिक उपयोजन
२. उपलब्ध स्थानिक संसाधनातून रोजगारनिर्मितीबद्दल माहिती
३. वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीतील समाजजीवनाचा अभ्यास
४. पर्यटन व्यवसायाची माहिती
५. मनोरंजनातून शिक्षण



महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण– इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली

## समाजशास्त्र विभाग

शैक्षणिक सहल (२०२४–२५)

(विजयदुर्ग-कुणकेश्वर-मालवण-सिंधुदुर्ग)

विद्यार्थी यादी

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नाव | गाव |
|---|---|---|
| १. | स्वप्नाली राजेंद्र मुसळे | वाटेगाव, ता. वाळवा |
| २. | सानिका शहाजी ताटे | तुजारपूर, ता. वाळवा |
| ३. | ऋतुजा सचिन लोंढे | तुजारपूर, वाळवा |
| ४. | संहिता एकनाथ पाटील | इस्लामपूर, ता. वाळवा |
| ५. | अदिती महेंद्र पाटील | कामेरी, ता.वाळवा |
| ६. | रोहिणी दीपक पाटील | कामेरी, ता.वाळवा |
| ७. | निकिता प्रमोद घाडगे | येडेनिपाणी, ता.वाळवा |
| ८. | प्रवीण रामचंद्र यादव | इस्लामपूर, ता. वाळवा |
| ९. | निशिकांत अशोक लोखंडे | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १०. | शंतनू दत्तात्रय भोसले | इस्लामपूर, ता. वाळवा |
| ११. | माणिक सिद्धार्थ पवार | पेठ, ता. वाळवा |
| १२. | उमेश मडाप्पा पुजारी | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १३. | सुजल राजाराम कांबळे | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १४. | निखील अनिल साळोखे | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १५. | अनिकेत संतोष देसाई | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १६. | सौरभ दत्तात्रय पवार | इस्लामपूर, ता. वाळवा |
| १७. | जय चंद्रकांत जांगळे | नायकलवाडी, ता. वाळवा |

प्राध्यापक : १. प्रा. रविराज शामराव सुर्यगंध  २. प्रा. सागर दगडू मोहिते  ३. प्रा. भाग्यश्री भागवत पाटील

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण– इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली

## समाजशास्त्र विभाग

शैक्षणिक सहल (२०२४–२५)

(इस्लामपूर – कोल्हापूर – कुणकेश्वर – मालवण – सिंधुदुर्ग – इस्लामपूर)

जमा खर्च तपशील

**प्रति विद्यार्थी २,०००/– प्रमाणे जमा रक्कम :**

एकूण विद्यार्थी १७ × २,००० = ३४,०००/–

प्राध्यापक ०२ × २,००० = ४,०००/–

**एकूण जमा रक्कम = ३८,०००/–**

### दोन दिवसीय सहल खर्च :

**प्रवास खर्च : १६,०००/–**

**दिवस ०१ :**

- **कुणकेश्वर** –
  बस पार्किंग फी – १००
- **मालवण (सिंधुदुर्ग)** –
  ✼ बस पार्किंग फी – २००
  ✼ अभ्यागत कर – १००
  (ग्रा. पं. वायरी भूतनाथ)
  बोटीतून प्रवास – २,०००
- **मुक्काम : देवबाग**
  जेवण + राहणे – १२,५००

**दिवस ०२ :**

- **देवबाग बीच** –
  बोटीतून समुद्री सफर – २,०००
- **रॉक गार्डन** –
  ✼ बस पार्किंग फी – १००
  ✼ प्रवेश फी – ९५

✼ रात्रीचे जेवण – ३,६००

(अल्पोपहार खर्च प्रा. रविराज सुर्यगंध, प्रा. सागर मोहिते, प्रा. भाग्यश्री पाटील यांच्याकडून)

एकूण खर्च = प्रवास खर्च + दिवस ०१ + दिवस ०२
= १६,५०० + १४,९०० + ५,७९५

**एकूण खर्च = ३६,६९५/–**

| | |
|---|---|
| **एकूण जमा रक्कम** | **३८,०००/–** |
| एकूण खर्च | – ३६,६९५/– |
| **शिल्लक** | = **१,३०५/–** |

(१३०५ ÷ १९ = ६८.६८ रु.)

**शिल्लक १,३०५/– प्रति विद्यार्थी ७० रु. प्रमाणे अदा.**